# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०६/०७/२०२३

दुखापत :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर अप न ४९४/२०२३ कलम ३२४,५०६ भादवी | देवीसदन येथिल सुपर हायवे वर अमरावती | दि ०५.०७.२०२३ चे २०.३० वा<br><br>रि. ता. वेळ ०६.०७.२०२३ चे ००.२२ वा. | विशाल नकुसराव भोसले वय २६ वर्ष रा. वडाळी देवीसदन मागे अमरावती | अखिल बबलु पवार वय १५ वर्ष रा. वडाळी देवीसदन मागे अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन यातिल आरोपी हा नेहमी फिर्यादी सोबत खोडया करतो व मारण्याच्या धमक्या देतो नमुद घ ता वेळी व ठिकानी यातिल फिर्यादी हा जेवण करून फिरण्याकरिता देवीसदन येथिल सुपर हायवे वर त्याचे मित्रासह गेला असता यातिल आरोपी हा सुध्दा तेथे फिरण्याकरिता आला व फि यास आरोपी ने जाणुन बुजुन धक्का बुक्की केली त्यावर फिर्यादी ने म्हटले कि तु नशेत आहे माझे सोबत मस्ती मजाक करू नको असे म्हटले असता यातिल आरोपी ने त्याचे कमरेमधुन चाकु काढुन फि च्या डाव्या साईडने कमरेवर मारला तसेच उजव्या बाजुला सुध्दा कमरेवर चाकु मारून जखमी केले वरुन फि ने त्याचे भावासह पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २. | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप.क्र. ८८१/२०२३ कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि | कृष्णा नगर तपोवन अमरावती | दि ०६-०७-२३ चे ०७-०० वा दरम्यान<br>दि ०६-०७-२३ चे १२-२९ वा | महेन्द्रसिंग मोरासिंग नाईक वय ६० वर्षे रा रा कृष्णा नगर तपोवन अमरावती | रोशन महेन्द्रसिंग नाईक वय ६० वर्षे रा कृष्णा नगर तपोवन अमरावती | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळा व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे वडील व मुलगा असुन नमुद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी याने दारु पिवुन फिर्यादीस तुम्ही या घरातुन निघुन जा नाहीतर दोघांनाही मारल्या शिवाय राहणार नाही अस म्हणुन ऑपरेशन झालेल्या डाव्या पायाचे जुन्या जखमेवर लाथ मारुन लोटलाट करुन शिविगाळ केली मारण्याचा धमकी दिली तसेच फि ची महिला नातेवाईक ही भांडण सोडविण्याकरीता मधे आली असता तिला सुद्धा आरोपीने शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली दोघानाही आरोपीकडुन धोका असल्याने कार्यवाही व्हावी करीता पो स्टे ला जहाणी रिपोर्ट दिला अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | पोस्टे राजापेठ अप क्र. ६३१/२३ क. ३२४ भादंवि | योगेक्षम कॉलणी अमरावती | दि. ५/७/२३ चे २३.४५ वा.<br><br>दा. ता. वेळ दि. ६/७/२३ चे ०१.५५ वा. | इंदल गुलौबराव पांडे वय ६५ वर्ष रा. विलास नगर शिव नगर अमरावती | योगेश हिम्मत पांडे वय २४ वर्ष रा. योगेक्षम कॉलणी अमरावती | हकीकत असा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे भावाचे भेटीला आरोपीचे घरि आला असता व जेवण करून घरि गप्पा करित असतांना नमुद आरोपी हा तेथे आला व तुम्ही घराबाहेर निघा मला घर विकायचे आहे. असे म्हणाला तर फिर्यादीने घर त्यांचे आहे तुच घराबाहेर निघ असे टोकले असता आरोपीने बाजुची लाकडी काठी उचलुन फिर्यादीचे डोक्यावर डावीकडे मारून जक्मी केले. फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मेडी सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल |

- **विनयभंग :-**

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | भातकुली अप क्र.129/23 कलम 354,506 भादवी | भातकुली | घ.ता.वे - दि.06/07/23 चे रात्री 12.00 वा दरम्यान<br>दा.ता.वे- दि06/07/23 चे 14.29 वा . | एक महिला | राजेश गणेशराव वानखडे वय-30 वर्ष रा- भातकुली | हकिकत अशा प्रकारे आहे कि फि यांनी पोस्टे ला येवुन समक्ष रिपोर्ट दिला राजेश गणेशराव वानखडेहा स्लॅप वरुन येवुन पायऱ्याचे सहा्य्ाने मी कपडे धुवत असलेल्या बाथरुममध्ये माझ्या जव आला व मी त्यास विचारले कि तु ईथे कसा आला मी आरडाओरड करते असे म्हणताच त्याने माझे तोंड दाबले व मला कवट्यात पकडले व मी आरडाओरड करित असता तु जास्त आवाज करु नको मी पायरी वर जाण्याचा प्रयत्न करित असता तो मला हात पकडुन खाली ओडण्याचा प्रयत्न केला व धमकि देवु लागला व पायऱ्याने स्लॅपवर पळुन गेला मला त्याने छेडछाड केल्याने मी माझ्या पतीला फोनद्वारे माहीती दिली पती घरी आल्यावर पोस्टेला तक्रार देण्याकरिता आली त्यांचे वर कारवाई होणे करिता रिपोर्ट देत आहे अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **जबरी चोरी :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अम शहर अप न ४९५/२०२३ कलम ३९२भादवी | अमरावती | दि ०५.०७.२०२३ चे १९.०० वा<br><br>रि. ता. वेळ ०६.०७.२०२३ चे ०१.२२ वा. | **एक महिला** | आकाश संतोष घारपवार वय २४ , रा. तेल्हारा जी अकोला | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातिल नमुद घ ता वेळी व ठिकानी यातिल फिर्यादी व लहान बहिन ऑटो मध्ये बसुन घरी येत असताना ऑटो मधुन फर्शी स्टाप पुजा कॉलनी जवळ उतरली तेव्हा फि च्या जवळ डाव्याहातामध्ये व्हाव्हलींग बॅग व उजव्या हातामध्ये हॅन्डबॅग पाठिवर घेवुन घरी जात असतानां थोडया अंतरावर एक इसम फिर्यादीच्या पाठीमागे येवुन फि च्या पाठीवरील लेदर बॅग जबरीने हिसाकावुन पळुन गेला फिर्यादी जोरजोराने आरडा ओरडा केला असता तो इसम फर्शी स्टॉप कडे पळत गेला त्याचे मागे लोक धावले व त्याला पकळुन त्याला ताब्यात धेतले व त्याच्या ताब्यातिल बॅग फि ला आनुन दिली फि ने बॅग केली असता त्यामधील गुलाबी रंगाची हॅन्डपर्स ज्यामध्ये अं नगदी २००० रु दिसुन आले नाही कोणितरी पोलीसानां माहिती दिल्याने त्या ठिकानी पोलीस आले व लोकांनी चोरी करणा.या इसमास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव आकाश संतोष घारपवार वय २४ , रा. तेल्हारा जी अकोला असे सांगितले वरून त्याचेवर कार्यवाही होणे करिता पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वुरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ विश्वासघात (फसवणुक) :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे गाड़गे नगर अमरावती<br>अप क्र ८८०/२३ कलम ४२० भादवि | अर्जुन नगर अमरावती | दि ०६-०२-२२ चे पुर्वी<br>दि ०६-०७-२३ चे ०३-४९ वा | प्रविण कुमार शिवहरी राउत वय ४० वर्षे रा अर्जुन नगर अमरावती | रोहीत माडेवार वय ४५ रा दत्तामेघे लेआउट हुडकेश्वर नागपुर | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेऴी व ठिकाणी यातील नमुद आरोपीने फि च्या व्हॉट्सअँप वर न्युज पेपर ची कंटीग पाठवुन रोकी फाउंडेशन या नावाने गृह कर्ज देत असल्याचे सांगुन फि कडुन ४६०००० लाख रु फसवणुक करुन बँकेचा डी डी दीला अश्य़ा फि चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ८७९/२३ कलम २०,२२ NDPS | आझाद नगर अमरावती | दि ०५-०७-२३ चे १८-२९ वा.<br>दि ०६-०७-२३ चे ००-२५ वा | पोउपनि प्रकाशराव नानाजी झोपाटे वय ५२ वर्षे रा गुन्हे शाखा अमरावती | फईमोद्दीन वल्द शरफोद्दीन वय २६ रा आझाद नगर अमरावती | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेऴी व ठीकाणी फिर्यादी हे पो स्टॉफ सह आयुक्तालय हद्दीत माहीती मिऴाली कि आरकोपी बे आझाद नगर अमरावती येथे कापडी पिशवी घेवुन उभा दिसला त्याची झडती घेतली असता त्याच्या हातातील पिशवी मध्ये हिरवा झाडपाला उग्र वास येणारा गांजा असल्याने तो माजमाप केला असता १ किलो ७५ ग्रॅम वजनाचा कि अं ५२५००/-रु चा माल जप्त केला अश्या पि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ACT | | | | | |
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र. ६३२/२३ क. ४,२५ आर्म अंक्ट सह कलम १४२,१३५ म. पो. का. | नवाथे हनुमान मंदीर जवळ अमरावती | दि. ६/७/२३ चे १०.०० वा.<br><br>दा. ता. वेळ दि. ६/७/२३ चे १३.५९ वा. | सर तर्फे पो. हवा सगर सरदार ब. नं. १५८ पो. स्टे. राजापेठ अमरावती | अक्षय घनशान दुबे उर्फ गोल्या वय २७रा. नवाथे देशपांडे प्लॉट अमरावती | हकीकत असा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे नमुद स्टॉपसह पो. स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करित असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की तडपार इसम लक्ष्मण दुबे हा हातात धारदार लोखंडी कत्ता घेवुन लोकांमध्य दहशतीचे वातावरण निर्माण करित आहे. वरिल माहिती वरून घटनास्थळी जावुन नमुद इसमास ताब्यात घेतले व त्याचे ताब्यातुन एक लोकंडी पात्याची लांबी मुठीसह२० इंच पात्याची लांबी १३.५ इंच, मुठ ०६ इंच ०५ सेमी रूंदी २ इंच टोक समोरून निमुळते पाते अका बाजुस धारदार मुठ गोल आकार कि. अं. २०० रू.मुळुन आला. नमुद तडीपार इसम हा. मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ -२ अमरावती शहर यांचे आदेश क्र. परि-२/ तडीपार/१५३/२०२२ दि. २५/१/२२ अन्वये दोन वर्षाकरिता अमरावती जिल्ह्यातुन तडीपार करण्यात आले असतांना देखिल नमुद इसम कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याची परमिशन न घेता अमरावती शहरात कत्ता घवुन लोकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण करण्याचे उद्देशाने आरडाओरड करित असतांना मिळुन आला. वरून तडीपर इसमाविरूध्द सदरचा गुन्ह दाखल |
| ४ | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ३३१/२३ कलम १३५ मपोका | मुजफ्फरपुरा अमरावती | दि.०६/०७/२०२३ चे २२/०५ वा ते २३/०५ वा दि.०६/०७/२३ चे ०१/२८ | मसपोनि वैशाली चव्हाण पो.स्टे नागपुरीगेट अमरावती | सलमान शाह सुलतान शाह वय ३० रा मुजफ्फरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांची एन.डी.ओ.ड्युटी दि. ०५/०७/२०२३ चे २१/०० वा ते दि.०६/०७/२३ चे ०९/०० वा पोवेतो ड्युटी असतांना वपोनि कुरळकर यांनी माहीती दिली की पो.स्टे सायबर अमरावती शहर येथुन माहीती मिळाली की. इंन्सटाग्राम अँप वर सलमान सलाउद्दीन अकाउंटावर व्हिडीओ वायरल केलेला आहे .सदर इसम अंदाजे २५ ते ३०वर्ष वयाचा आपले जवळ पिस्टल सारखी वस्तु पाठीमागे पिल्लरवर ठेवुन व्हिडीओ.वायरल केलेला आहे सदर इसम हा नागपुरीगेट परिससरातील असल्याचे संशय आहे अशा माहीती वरुन फिर्यादी पो.स्टाप सह जावुन नमुद इसमाचा शोध घेतला असता त्याचे नाव सलमान शाह सुलतान शाह वय ३० रा मुजफ्फरपुरा अमरावती असे समजले म्हहणुन सदर इसमाच्या घरी जावुन त्याला बाहेर बोलावुन त्याला त्याचे पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातुन एक फोडर्लीग चाकु मिळुन आला सदरचा चाकु जप्त करुन त्यास व्हिडीओ मध्ये असलेला पिस्टल सारखी दिसनारी वस्तु बाबत विचारपुस केली असता त्याने ती वस्तु आमचे समक्ष हजर केल्याणे आम्ही पंचासमक्ष खात्री केली असता ते पिस्टल नसुन पीस्टल सारखे बनावटी दिसणारे लायटर असल्याची खात्री झाली सध्या अमरावती शहरात मा पोलीस आयुक्त सा यांचे आदेश क् पो आ अ/विशा/कावसु/२२४५/२०२३ दि २६/०६/२०२३ नुसार दि. २६/०६/२३ चे ००/०१ वा ते दिर्ं . १०/०७/२०२३ चे २४/०० वा पर्यंत कलम ३७(१)(३), मपोका प्रमाने लागु असुन सुद्धा नमुद आरोपीने आपले जवळ चाकु बाळगुण मीळुन आल्याने त्याने मा.पोलीस आयुक्त सा योंचे आदेशाचे उलघन केल्याने सदर चा गुन्हा दाखल |
| ५ | अप क्र.130/23 कलम 141,170,323,4 | | घ.ता.वे - दि.05/07/23 चे रात्री 08.00 वा दरम्यान | विठ्ठल दामोदर येवोकार वय-35 वर्ष रा-रामापुर ता- | मोटार सायकल क्र.एम.एच-27-डि.बी2687 चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे कि फि यांनी पोस्टे ला रिपोर्ट दिला कि मी वर नमुद पत्यावर कुटुंबासह राहतो व चालक म्हणुन काम करतो दि.05/07/23 रोजी सायंकाळी 18.30 वा दरम्यान मी निलेश चव्हाळे रा-सुकळी ता-अकोट जि-अकोला ह्यांचे लग्णाचे वरात घेवुन माझी फोरव्हीलर अर्टिका एम.एच-13-बी.एन-4963 ने फुकदा वरुन भातकुली मार्गे जात असतांना ऋणमोचन ते आसरा रोड वर रात्री 20..00 वा दरम्यान एक ईसम त्यांची मोटार सायकल .क्र. एम.एच-27-डि.बी2687 ने |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 27,504, 506, भादवी | | दा.ता.वे- दि06/07/23 चे 15.16 वा . | अकोट जि- अकोला | | आमचे गाडीचे मागुन येवुन आमचे गाडीचे समोर येवुन त्याची मोटार सायकल आमचे गाडीसमोर थांबवली व आम्हाला मी पोलीस आहे तुम्ही तुमचेगाडीचे कागदपत्र व लायसन दाखवा वरुन मी त्याला तुम्ही पोलीसाचे आय कार्ड दाखवा असे म्हटले असता त्यांने माझ्या सोबत वाद घालुन त्याने त्याचे कमरेचे बेल्ट काढुन मला मारला वरुन माझे सोबत असलेले निलेश चव्हाळे व त्यांचे कुटुंबिय गाडीतुन बाहेर आले व त्याला समजाविण्याचा प्रयत्न करित असता त्याने मला व माझ्या गाडीत असलेल्या लोकांचे अंगावर गेला व त्यांना व मला शिवीगाळ केली. वरुन आम्ही सर्व त्याचे वर बावरलो असता त्याने माझ्या गाडीचे चाबी ओढुन तोडुन टाकली तसेच आमचे गाडीचे उजवे बाजुचे समोरील टायरचे हवा सोडुन तसेच आमचे गाडीचे फोटो काढुन तुम्हाला चालान करतो अशी धमकि देवुन तो तेथुन त्याचे मोटार सायकल घेवुन निघुन गेला. लग्णाची वरात असल्यामुळे मी तेथुन त्यांना सोडण्याकरिता निघुन गेलो व आज रोजी पोस्टे ला येवुन रिपोर्ट देत आहे.अशा फि चे रिपोर्ट वरुन वैद्यकिय अधिकारी यांच्य मेडी.सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **प्रोव्हीशन रेड :-**

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| १. | पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | ४९६/२०२३ कलम ६५ (क) (फ)( ड )मदाका | अमरावती | दि ०६/०७/२०२३ चे ०७.१० ते ०८.१० वा दरम्यान | दि. ०६/०७/२०२३ चे ११/४८ वा. | सरतर्फे पोहेकॉ दिपक महादेव सुंदरकर बन १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | एक महिला | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी हे पो स्टाप सह अवैध धंदयावर रेड करणे कामी पेट्रोलींग करित असतानां एका गुप्त बातमीदारा कडुन माहीती मिळाली वरून पो स्टाफ चे मदतिने पंचासमक्ष नमुद आरोपीवर प्रो रेड केली असता नमुद आरोपींचे कब्जातुन एक लोखंडी काळा ड्रम कि अ १५०० रू एक जर्मन चे घमेले कि अ १०००, एक झाकनी नळी असलेली कि. अ २५० रू , एक नवार पटटी कि अ १००रू , एक प्लास्टीक बकेट कि १०० रू व ५० लिटर लोखंडी ड्रम मधिल मोहामासचा सळवा कि अ १५०००/रू , १५ लिटर काढलेली गावठी हातभटटी ची दारू कि अ ३०००/रू असा एकुण २०९५०/—रू. चा मुददेमाल मिळुन आल्याने तो पंचांसमक्ष जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन ताब्यात घेतला आरोपीतांचे हे कृत्य कलम ६५ (क) (फ)( ड )मदाका |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | प्रमाणे होत असल्याने फियादीचे लेखी रिपोर्ट वुरुन आरोपी विरुध्द सदरचा गुन्हा दाखल |
| २. | बडनेरा | अप क्र ४९६/२०२३ कलम ६५ (इ) म.दाका | चाँदणी चौक नवी वस्ती बडनेरा | दि ०५/०७/२०२३ चे २२.१५ वा. | दि ०६/०७/२०२३ चे ००.४६ वा. | सरतर्फे नापोका इरफान रायलीवाले, ब.न. १८७१, पो.स्टे. बडनेरा | १ )मिथुनसिंग महिपालसिंग बावरी वय- २८ वर्ष रा. सदगुरु नगर नवी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १० नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ६००/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |
| ३. | बडनेरा | अप क्र ४९७/२०२३ कलम ६५ (इ) म.दाका | आरोपीचे राहते घरासमोर ग्राम उत्तमसरा ता.जि.अमरावाती | दि ०६/०७/२०२३ चे १३.२० वा. | दि ०६/०७/२०२३ चे १५.२९ाा. | सरतर्फे सपोउपनी अहेमद अली ब.न. ७८४, पो.स्टे. बडनेरा | १ ) ज्ञानेश्वर रामदासराव मेश्राम वय- ४८ वर्ष रा. ग्राम उत्तमसरा ता.जि.अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १४ नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml पावट्या, कि.अं. ९८०/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |